# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 08/03/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 किमी अंतरावर झुल्लर शिवार येथे दिनांक 06/03/2021 चे 22.10 वा. दरम्यान सर तर्फे पो.नि. हेमंतकुमार खराबे पो.स्टे. मौदा हे पो.स्टे स्टाफसह पोस्टे परीसरात अवैध रेती वाहतूक केसेस करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना विश्वसनिय खबर मिळाली की, झुल्लर शिवारात कन्हान नदीच्या पात्रातुन अवैधरित्या रेती वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून पो. स्टे. स्टाफने नाकाबंदी करून झुल्लर गुमथळा रोडकडे कन्हान नदीच्या पात्राकडून येणाऱ्या रोडने 22.10 वा. दरम्यान ट्रॅक्टर व ट्रॉली क्र. एमएच–40/एएच–3257 ला थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये एक ब्रास रेती किमंती 2,000/– रु ची भरुन दिसून आली. आरोपी नामे– विलास रमेश बावणे, वय 37 वर्ष, रा. वडोदा याने सदर रेतीचा रॉयल्टी तसेच महसूल विभागाचा कोणताही आदेश नसल्याचे सांगीतले व ट्रॅक्टर मालकाचे सांगण्यावरुन एक ब्रास रेती झुल्लर शिवारातील कन्हान नदीचे पात्रातून चोरुन भरुन घेवून जात असतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन वाहनासह असा एकुण असा एकुण 3,02,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बिरोले 9403701263 हे करीत आहे.

### गांजाची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. बोरी :– दिनांक 07/03/2021 रोजी पोस्टे. बोरी येथील स्टाफला बातमीदाराचे मार्फत गुप्त माहिती मिळाली की, एक इसम हा गांजाची अवैद्यरित्या वाहतुक करीत आहे. अश्या मिळालेल्या माहितीवरून पो. स्टे. बोरीचा स्टाफ हे दिनांक 07/03/2021 चे 03.55 वा. दरम्यान मौजा बोथली शिवार रिलायन्स पेटोल पंप जवळ नागपूर ते चंद्रपूर रोड येथे नाकाबंदी दरम्यान रेड केली असता आरोपी नामे– राजेन्द्रसिंग उर्फ गुडडू लखनसिंग जुन्नी, वय 28 वर्ष, रा. गोसाई नगर बोरी याचे ताब्यातून एक खाकी रंगाचे प्लास्टीक बंडल त्यामध्ये 3 किलो 24 ग्रॅम गुंगीकारक वनस्पती गांजा किं 30,024/– रू, एक रेड मी कंपनीचा निळया रंगाचा स्मार्ट मोबाईल फोन कि 10,000/–रु, एक सॅमसंग कंपनीचा साधा मोबाईल निळया रंगाचा किंमती 1,000/– रू, नगदी 150/– रू. व एक पांढऱ्या रंगाची स्कॉर्पीओ किं. 4,00,000/– रु. असा एकुण 4,41,174/– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोउपनि श्री. मोरखेडे पो.स्टे. बोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 20, 22 एन. डी. पी. एस. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. सोनटक्के 8326460482 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर